
घरचा स्वाद, घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द तूप
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२६७ ■ मंगळवार ३० जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26



॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा 9765595037 9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.

१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे


### ओडिशा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेशला विस्तारात महत्त्व

# मोदी सरकारमधून सहा मंत्र्यांची उचलबांगडी होणार? महाराष्ट्रातून श्रीकांत शिंदे यांच्यासह नऊ नवीन चेहरे

**नवी दिल्ली, दि. २९ : केंद्रात मंत्रीमंडळ विस्तार आणि फेरबदल होण्याची शक्यता आहे. विस्तार उद्या (दि. ३०) होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. या फेरबदलामध्ये अनेक दिग्गज मंत्र्यांना डच्चू दिला जाऊ शकतो. तर काही अत्यंत धक्कादायक आणि नवीन चेहऱ्यांची एन्ट्री होऊ शकते. या फेरबदलात कामगिरीच्या आधारावर आणि राजकीय दबावामुळे काही बड्या मंत्र्यांची मंत्रीमंडळातून गच्छंती होण्याची दाट शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या राष्ट्रपती भवनातील लागोपाठच्या गाठीभेटींमुळे हा मंत्रीमंडळ विस्तार आता अंतिम टप्प्यात असल्याचे मानले जात आहे.**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची गच्छंती होऊ शकते. देशातील राष्ट्रीय प्रवेश परीक्षांच्या कथित पेपर लीक वादामुळे धर्मेंद्र प्रधान यांच्यावर प्रचंड राजकीय दबाव आहे. त्यामुळे या फेरबदलात त्यांची मंत्रीमंडळातून सुट्टी होऊ शकते, असे मानले जात आहे. पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंह पुरी यांनाही मंत्रीमंडळातून वगळले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पक्ष संघटना किंवा अन्य जबाबदारीसाठी त्यांच्या नावाचा विचार केला जाऊ शकतो. याशिवाय, ज्या मंत्र्यांची कामगिरी समाधानकारक राहिलेली नाही किंवा ज्या राज्यांमध्ये आगामी काळात निवडणुका आहेत, तेथील समीकरण साधण्यासाठी काही कनिष्ठ मंत्र्यांनाही डच्चू दिला जाण्याची शक्यता आहे.

**किती नवीन चेहरे येऊ शकतात?**

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर आणि पंतप्रधानांचे माजी प्रधान सचिव शक्तिकांत दास यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा आहे. त्यांना थेट मंत्रीमंडळात आणून अत्यंत महत्त्वाची जबाबदारी दिली जाऊ शकते. महाराष्ट्रातून महायुतीचे समीकरण मजबूत करण्यासाठी आणि शिंदे गटाला योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांची केंद्रीय मंत्रीमंडळात एन्ट्री होण्याची दाट शक्यता आहे. भाजप खासदार अरुण गोविल (रामायण फेम-राम) यांनाही मंत्रीमंडळात स्थान मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. **(पान २ वर)**

## नसरापूर अत्याचारी कांबळेला फाशीच

पुणे, दि. २९ : जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडे तीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून



तिचा निर्दयीपणे खून करणाऱ्या भीमराव कांबळे (वय ६५) याला आज कोर्टाकडून शिक्षा सुनावण्यात आली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयाने गुरुवारी झालेल्या सुनावणीत कांबळेला या प्रकरणात दोषी ठरवले होते. त्यामुळे कांबळेला फाशी होणार की जन्मठेप, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आज त्याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. कांबळेला फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर अत्याचार झालेल्या बालिकेच्या कुटुंबियांच्या डोळ्यात तिच्या आठवणीने अश्रू तरळले.

### टीईटी पुढील वर्षी ऑनलाईन-ना भुसे

# नोटा राज्यात, प्रश्नपत्रिका आग्रा येथे का छापल्या? सुधीर मुनगंटीवारांच्या प्रश्नाने झाली 'पोलखोल'

मुंबई, दि. २९ : टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्याने २८ जूनची परीक्षा रद्द झाली. आता टीईटी परीक्षेची नवीन तारीख महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर लवकरच





प्रसिद्ध करण्यात येणार आहे. आगामी काळात असे प्रकार रोखण्यासाठी आता ही परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याबाबत सरकारने तयारी सुरू केली आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी याबाबत विधानसभेत माहिती दिली आहे. **(पान २ वर)**


# पुण्यानुमोदन

## २३ वा स्मृतीदिन



कालकथित रूख्मिनीताई दौलतराव खैरनार
(निर्वाण - दि. ३०.६.२००३)

ताई आपल्या स्वकर्तृत्वाने बहरलेली बाग दिवसेंदिवस बहरत आहे. आमच्या संसारात आपण दिलेल्या आदर्श गुणांच्या शिदोरीमुळेच आमची आजवर प्रगती होत आहे. आपल्या २३ व्या स्मृतीदिनानिमित्त आपल्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

आपले

आयुष्यमती शोभना रमेश खैरनार (सून)
आयुष्यमती संगिता ईश्वरचंद्र खैरनार (सून)
आयुष्यमती सुनंदा चंद्रकांत खैरनार (सून)
आयुष्यमती ज्योती शशिकांत खैरनार (सून)
आयुष्यमती प्रमिलाबाई यादवराव भामरे (मुलगी)
आयुष्यमती नंदिनी बुद्धभूषण बच्छाव (नात)
आयुष्यमती वनमाला भास्कर कढरे (नात)
आयुष्यमती प्रेमलता संजय बागुल (नात)
आयुष्यमती मोनीका विनोद माकेगांवकर
आयु.सोनाली सम्यक खैरनार

आयुष्यमती रत्नाबाई दिलीप खैरनार (सून)
प्रा. ईश्वरचंद्र दौलतराव खैरनार (मुलगा)
आयु. चंद्रकांत दौलतराव खैरनार (मुलगा)
आयु. शशिकांत दौलतराव खैरनार (मुलगा)
आयुष्यमती चंद्रकलाबाई अरूण वाघ (मुलगी)
आयु. बुध्दभूषण सहादू बच्छाव (नात जावाई)
आयु. भास्कर उदयसिंग कढरे (नात जावाई)
प्रा. संजय राजाराम बागुल (नात जावाई)
आयु.विनोद मारूती माकेगांवकर
आयु.सम्यक ईश्वरचंद्र खैरनार

नातवंडे- डॉ.कुंदन, प्रा.राजेश, प्रशांत, अर्चना, सुजाता, प्रमोद, राहुल, सुवर्णा, आम्रपाली, भाग्यश्री, सम्यक, संग्राम, सौरभ, चिऊ, साहिल, मनोज, हर्षल, गुड्डू, टिना, सारा, खुशी, स्वाती, रिया, प्राची, राजवीर, दर्श, अर्णव.

**तसेच समस्त खैरनार परिवार नांद्रे, ता.जि.धुळे.**

• सौजन्य - ✲ डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान, धुळे.
✲ शासनमान्य मुक्तद्वार - सिध्दार्थ सार्वजनिक ग्रंथालय, धुळे.
✲ कालकथित रुख्मिनीताई दौलतराव खैरनार सार्वजनिक, ग्रामिण ग्रंथालय नांद्रे, ता.जि. धुळे.



## जिवेत शरदः शतम्

विश्वासाने जग जिंकुन,
सदैव प्रत्येकाच्या मदतीस धावणे तुमचे!
क्षमाशील वृत्ती, उदात्त स्वभाव,
आदर्श ठरता आमच्या जीवनाचे!
म्हणूनी तुमच्या वाढदिवसाला आम्ही,
गुच्छ आणले शुभेच्छांचे!

**मा. आप्पासो. किशोर यशवंत पाटील**



शुभेच्छुक

❁ उज्ज्वल ऑटोमोटिव्हज प्रा. लि. - धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक
❁ डी.आर.पाटील कन्स्ट्रक्शन प्रा. लि. - धुळे
❁ ध्रुव होंडा प्रा. लि. - धुळे, दोंडाईचा ❁ ध्रुव ऑटो सर्व्हिसेस (BPCL) - धुळे


# भाजपाचे ज्येष्ठ नेते दयानंद मेहतांचा आ.अग्रवाल यांच्या उपस्थितीत सत्कार



धुळे, दि. २९- सहजीवन ज्येष्ठ नागरिक संघ, कुमारनगर यांच्या वतीने भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनसंघापासून भारतीय जनता पक्षाच्या उभारणीत मोलाचे योगदान देणारे आदरणीय दयानंदजी मेहता यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त पूज्य बहावलपुरी पंचायत भवन येथे भव्य नागरी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी आ. श्री. अनूप अग्रवाल यांच्या हस्ते केक कापून दयानंदजींचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. **(पान २ वर)**


**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,30,650 रु.+3% GST
सोने- 24 K -1,42,600 रु.+3% GST
चांदी- 2,27,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



SVKM NMIMS Global University

# SVKM NMIMS Global University

## Admission Open 2026-27



### School of Technology Management & Engineering (STME)

- B.Tech
- B.Tech + MBA (Tech Management)
- M.Tech
- MCA (Master of Computer Application)
- Ph.D. (Technology / Engineering)

9425685966 / 9764405069

Accredited by NBA

NAAC (Awaited)

Admissions Open for Direct Second Year Engineering

### School of Pharmacy and Technology Management (SPTM)

- D.Pharm.
- B.Pharm. + MBA (Pharma Tech)
- B.Pharm.
- B.Tech. (Cosmetic Technology)
- M.Pharm.

9158947999 / 8668501496

Accredited in 1st cycle with A+ Grade (CGPA 3.43) by NAAC

Accredited by NBA (Diploma Program)

Direct Second Year (Lateral Entry) B. Pharm. & B. Pharm. + MBA (Pharma Tech)

### School of Commerce (SOC)

- BBA (Bachelor of Business Administration)
- BCA (Bachelor of Computer Applications)

9272110073 / 8788701642 / 9673730895 / 8007700749

## FACILITIES



### Salient Features

- World-class faculty with global academic & industry experience.
- State-of-the-art infrastructure & smart learning facilities.
- Strong focus on research, innovation, publications & patents.
- Excellent placement support with top-tier recruiting partners.
- Comprehensive development programs for leadership & soft skills.
- Dynamic campus life with vibrant cultural & sports activities.

REGISTER NOW

**Registrations Started!**
Call now and complete your registration today.

**Admission Through :** MHT-CET / JEE / NEET / NCET / SAT / PERA-CET / NPAT / GATE / GPAT / CUET

Behind Gurudwara, Mumbai-Agra Highway, Dhule - 424001

www.svkmnmimsgu.ac.in

आपला महाराष्ट्र

# जल स्वराज्य हीच खरी संपूर्ण क्रांती

विद्यमान व्यवस्थेने २५ जून हा लोकशाहीचा काळा दिवस पाळण्याचा सिलसिला सुरू केलेला आहे. कुळाची इच्छा असो की नसो त्या दिवशी जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यादिवशी आणीबाणी लागू करण्यात आली होती. अनेकांना तुरुंगात डांबण्यात आले होते पण श्रीमती इंदिरा गांधी यांनी घटनेत असलेल्या तरतुदीचा वापर करून आणीबाणी लागू केली होती. नंतरच्या सरकारने घटनेतील ही तरतूद काढून टाकली त्या घटनेला आता पन्नास वर्षाहून अधिक काळ लोटला परंतु नव्या पिढीच्या डोक्यात घालण्यासाठी विद्यमान राजकीय व्यवस्थेने आणीबाणीचा दिवस काळा दिवस पाळण्याची ठरविले, मात्र आता रोजच आणीबाणी असते. या घोषित आणीबाणी म्हणावी लागेल. या संदर्भात बरेच काही बोलता येईल मात्र आमच्या मते यातून नकारात्मक ते शिवाजी दुसरे काही निष्पन्न होणार नाही. त्याऐवजी हा दिवस संपूर्ण क्रांती दिन म्हणून का पाळला जाऊ नये? जलपुरुष डॉक्टर राजेंद्र सिंग यांनी या चांदवड फार चांगला विचार मांडला आहे. ते असे म्हणतात की संपूर्ण क्रांतीची खरी कहाणी सत्ता बदलातूनन सुरू होत नाही. तर ती आंदोलनातून सुरू होते. ज्या लोकांनी जल, जंगल, जमीन ग्रामस्वराज्य यासाठी आपल्या जीवनाचा होम केला. आणि स्वतःची आहुती दिली. ही संपूर्ण क्रांती म्हणावी लागेल. १९७५ साली असंख्य लोक या क्रांतीत सहभागी झाले होते तो दिवस ते साजरा करतात. आणीबाणीचा काळा दिवस पाण्याऐवजी या प्रकारे सकारात्मक ऊर्जा जन्माला दिवस साजरा करणे केव्हाही चांगले.

२५ जून हा संपूर्ण क्रांती दिन आहे. हा दिवस सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या आंदोलनात हजारो–लाखो युवक सहभागी झाले होते. त्यांपैकी हजारो कार्यकर्त्यांनी पूर्णवेळ सामाजिक कार्याचा मार्ग स्वीकारला. अनेकांनी सरकारी नोकऱ्या सोडल्या, तर अनेकांनी महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून समाजकार्याची वाट धरली. त्यांच्या अंतःकरणातील वैचारिक क्रांतिनेच त्यांना संपूर्ण क्रांतीच्या हाकेला प्रतिसाद द्यायला प्रेरित केले होते. त्यामुळे देशभरातील सर्व राज्यांत संपूर्ण क्रांतीची एक लाट निर्माण झाली होती. हे कार्यकर्ते गीते गात, नव्या तरुणांना प्रेरणा देत, त्यांना सामाजिक कार्याशी जोडत आणि समाजजागृतीचे काम करत होते.

ही सामाजिक चेतना देशभर खोलवर रुजली. तिच्या बळावर देशाने नव्या आत्मविश्वासाने उभारी घेतली. त्यातून आणीबाणीचा अंत झाला आणि नव्या व्यवस्थेला देश चालवण्याची संधी मिळाली. मात्र त्यावेळी संपूर्ण क्रांतीची बीजे लोकांच्या विचारांत, वर्तनात आणि संस्कारांत पूर्णपणे परिपक्व झाली नव्हती. क्रांतीची बीजे होती, पण तिची प्रगल्भता विकसित व्हायची होती.

राजकीय परिवर्तनाची इच्छा बाळगणारे कार्यकर्ते सभा, बैठका, संमेलने आणि संघर्षांत दिवस–रात्र कार्यरत असत. आपल्या विचारांना परिपक्व करण्यासाठी ते सातत्याने प्रयतक्शील होते. परंतु काहींना हे राजकीय परिवर्तन रुचले नाही. काही जणांना संपूर्ण क्रांतीतील काही सहकारी सत्तेला चिकटून राहू लागले आणि जुन्या राजकारण्यांप्रमाणेच वागू लागले, हे पाहून निराशा वाटू लागली. त्यांच्यात साधेपणा आणि सद्भावना होती, त्यामुळे जुन्या सत्ताधाऱ्यांपेक्षा काहीसा फरक निश्चितच होता; पण सत्तेच्या स्वभावामुळे अपेक्षित संवेदनशीलता दिसत नव्हती. विविध विचारधारांच्या मिश्रणामुळे जुन्या राजकीय पक्षांतील उणिवाही पुढे येऊ लागल्या. अवघ्या अडीच वर्षांत सत्तेचे विघटन सुरू झाले. त्यानंतर अनेक कार्यकर्ते निसर्ग आणि समाजाच्या पुनर्निर्माणाच्या कामात उतरले. काहींनी मोठ्या धरणांविरोधात चळवळी उभारल्या, काहींनी भूमिहीनांना जमीन मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. आजही अनेक कार्यकर्ते गरीबांना जमीन मिळवून देण्याचे काम करत आहेत. काहींनी विज्ञान लोकविज्ञान बनवण्याचे, तंत्रज्ञान लोकाभिमुख करण्याचे आणि लोकअभियांत्रिकी विकसित करण्याचे काम हाती घेतले. कंचनमुक्तीपासून पैशाविना जगाच्या संकल्पनेपर्यंत अनेक प्रयोग झाले. संपूर्ण क्रांती आंदोलनाशी जोडले गेलेल्या अनेकांनी जगभर प्रवास करून हे विचार पोहोचवले. संपूर्ण क्रांती ही केवळ भारतापुरती मर्यादित नव्हती; ती संपूर्ण जगात परिवर्तन घडवण्याची आकांक्षा होती.

अनेक जण संपूर्ण क्रांतीच्या बैठकीत मागच्या रांगेत बसत असत. त्यांना वाटले की या धावपळीच्या आणि संघर्षाच्या काळात आपणही आपल्या पातळीवर काहीतरी विधायक काम केले पाहिजे. काहींचा स्वभाव एकट्याने काम करण्याचा नव्हता. सहकाऱ्यांसोबत काम करायला त्यांना आवडत होते. तरीही ब–याच लोकांना काही कामांची सुरुवात स्वतःहून करावी लागेल, असे वाटले. काही काळ काहींनी शासनासोबत काम केले आणि नंतर समाजासोबत. पुन्हा सरकारी जबाबदाऱ्यां काहींनी स्वीकारल्या. तेव्हाही त्यांना अरावली पर्वतरांगांतील वाढते तापमान आणि पर्यावरणीय संकट यांची चिंता सतावत होती. त्या वेळी ही समस्या फार मोठी वाटत होती. खाणकाम करणारे प्रभावशाली लोक असल्यामुळे त्यांच्याशी थेट संघर्ष करणे शक्य नव्हते. म्हणून या विषयाचा अभ्यास करण्यासाठी परिसंवाद, यात्रा आणि चर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या अरावलीविषयी परिसंवाद घेतले. नंतर असा विचार झाला की अरावलीचे पुनरुज्जीवन करायचे असेल तर जिथे विनाश तुलनेने कमी झाला आहे अशा भागातून सुरुवात केली पाहिजे. पण शोध घेतल्यावर जवळजवळ संपूर्ण प्रदेश खाणकामामुळे उद्ध्वस्त झालेला कार्यकर्त्यांना दिसला बऱ्याच परिसरात भूजल आटले होते, नद्या कोरड्या पडल्या होत्या आणि विहिरीही नष्ट होत होत्या. सर्वत्र विनाशाचे चित्र होते.

त्या वेळी संपूर्ण क्रांतीच्या ज्येष्ठ विचारवंतांसमवेत डॉ.राजेंद्र सिंह यांच्या सारख्यांनी काम सुरू केले.. त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. असे ते म्हणतात. पुढे जात पाण्याला त्यांनी कार्याचा केंद्रबिंदू बनवला. आज महात्मा गांधी जिवंत असते, तर जसे त्यांनी मँचेस्टरच्या औद्योगिक वर्चस्वाविरुद्ध चरख्याला स्वावलंबनाचे प्रतीक बनवले, तसेच आज त्यांनी जलस्वराज्याचे आंदोलन उभे केले असते असे या क्षेत्रात काम करणाऱ्यांनी म्हटलेले आहे .पाण्याच्या लुटीपासून देशाला वाचवणे ही आजची सर्वात मोठी क्रांती आहे आणि तीच आपल्याला संपूर्ण क्रांतीकडे नेईल.गावचे पाणी गावात, गावची माती गावात,प्रत्येक अमावास्येला ग्रामसभा भरावी, गावातील छोट्या समस्या गावातच सोडवाव्यात. गावचे पाणी गावातच राहिले, तर शेती समृद्ध होईल, मातीचे संरक्षण होईल आणि ग्रामस्वराज्याची स्थापना होईल.आसे हे सूत्र आहे .सुरुवातीला अनेकांना हा विचार फार मोठा आणि अवघड वाटत होता. पण काम करताना त्यांच्या लक्षात आले की गावकरी जेव्हा तलाव बांधतात तेव्हा ते श्रमदान करतात, एकत्र बसून प्रत्येक कुटुंबाचा सहभाग ठरवतात आणि सामूहिक प्रयतकांनी काम पूर्ण करतात.

त्या वेळी काम खरणारांकडे जवळजवळ कोणतीही आर्थिक साधने नव्हती. तरी समाजाची प्रेरणा इतकी प्रबळ होती की लोक स्वतःहून पुढे येऊन काम करू लागले. हळूहळू ही जलक्रांती एका गावातून एका नदीपर्यंत आणि पुढे संपूर्ण नदीखोऱ्यात पसरली. अरवरी नदीच्या पुनरुज्जीवनासोबत लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी नदी संसद स्थापन झाली. या प्रक्रियेत अनेक विचारवंत सहभागी झाले. हे पाहून प्रशासकीय अधिकारीही प्रभावित झाले. गावांमध्ये आजही प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता जिवंत असल्याचे त्यांना आश्चर्य वाटत होते.

जिथे पाणी परत आले, तिथे शहरांकडे गेलेले लोक पुन्हा गावात परतले आणि शेती करू लागले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अरावलीतील हजारो खाणी बंद झाल्यावर अनेक लोक बेरोजगार झाले. त्यांना जलसंवर्धनाचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामुळे त्यांच्यात नवी स्फूर्ती निर्माण झाली. पूर्वी खाणकामामुळे अनेक आजारांनी त्रस्त झालेले लोक आता सन्मानाने आणि निरोगीपणे जगू लागले. ते स्वावलंबी, सन्मानित आणि समृद्ध झाले. हाच खरा परिवर्तनाचा मार्ग होता.

संपूर्ण क्रांती आंदोलनात ज्या गोष्टींची चर्चा कार्यकर्ते सभांमध्ये करत होते त्या आता प्रत्यक्ष जमिनीवर दिसू लागल्या. १९७० आणि १९८० च्या दशकात संपूर्ण क्रांतीचे जे विचार अनेकांच्या मनात, बुद्धीत आणि हृदयात खोलवर रुजले होते, ते प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची संधी पुढे त्यांना मिळाली. जोहड बांधण्याचे किंमतही त्या काळात राजस्थानात झाले. त्यानंतर अनेक बंधारे आणि जोहड उभे राहिले. जसजसे पाणी परत आले तसतसा हा प्रयतक व्यापक जलक्रांतीत परिवर्तित झाला.

या जलक्रांतीने समता, साधेपणा, श्रमनिष्ठा आणि समाजनिर्मितीची मूल्ये प्रत्यक्ष व्यवहारात रुजवली. शोषण, प्रदूषण आणि अतिक्रमण रोखण्याच्या दिशेनेही सकारात्मक परिणाम दिसू लागले. या कार्याविषयी प्रथम प्रेम निर्माण झाले, नंतर विश्वास आणि शेवटी श्रद्धा निर्माण झाली.

आज या क्षेत्रात काम करणारे सत्तरीच्या उंबरठ्यावर आहेत.पण त्यांच्या कामाचा उत्साह अजूनही सत्तावीस वर्षांच्या तरुणासारखाच आहे. आत्मपरीक्षण करताना त्यांना जाणवते की हे सर्व शक्य झाले, कारण त्यांच्या तारुण्यात संपूर्ण क्रांतीचे विचार, आचार आणि संस्कार त्यांच्या मनात, बुद्धीत आणि हृदयात खोलवर रुजले. त्याच संस्कारांनी त्यांना श्रमशील, परिश्रमी आणि समाजासाठी समर्पित बनवले.

आजही त्यांच्या मनात ठाम विश्वास आहे की जल, माती, हवा आणि आकाश यांना निरोगी ठेवण्यासाठी जे कार्य केले जाते, तेच संपूर्ण क्रांतीचे खरे कार्य आहे. कारण अशा कार्यात निसर्ग आणि संस्कृतीबद्दल सद्भावना दडलेली असते. आज धार्मिक सद्भावने पेक्षा अधिक निसर्ग आणि संस्कृतीबद्दल सद्भावना आवश्यक आहे. आपल्या वर्तनात निसर्ग आणि संस्कृतीबद्दल आदर असेल, तर सर्व धर्मांबद्दलही समान आदर निर्माण होईल. म्हणूनच अशा कार्यकर्त्यांना विश्वास आहे की जल, जमीन आणि निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी केलेले कार्यच आपल्याला खऱ्या अर्थाने संपूर्ण क्रांतीकडे घेऊन जाते.

## उप्परपिंड उबाठा पदाधिकाऱ्यांचा आ.पटेलांच्या साक्षीने भाजपात प्रवेश



**शिरपूर, दि.२९(प्रतिनिधी)- शिरपूर तालुक्यातील उप्परपिंड येथील शिवसेना (उबाठा) गटाच्या असंख्य युवा पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. जनक विला, शिरपूर येथे शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी सायंकाळी झालेल्या प्रवेश सोहळ्यात माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा आणि माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश उत्साहात संपन्न झाला.**

यावेळी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी नवप्रवेशितांचे स्वागत करून भारतीय जनता पक्षाच्या विकासाभिमुख विचारसरणीवर विश्वास व्यक्त केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भूपेशभाई पटेल यांनी पक्षात प्रवेश केलेल्या युवकांचे स्वागत करताना सांगितले की, युवा शक्तीच्या सहभागामुळे संघटनात्मक कामाला अधिक गती मिळेल. आगामी काळात विकासकामे आणि जनसेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, बाजार समिती सभापती के. डी.पाटील, साखर कारखाना चेअरमन माधवराव पाटील, माजी जि.प.उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, कारखाना उपाध्यक्ष दिलीपभाई पटेल, उप्परपिंड माजी उपसरपंच आनंदिसंग दौलतसिंग राजपूत, माजी उपसरपंच इंद्रसिंग दौलतसिंग राजपूत, माजी पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील, माजी उपसरपंच भुरा पाटील, शिरपूर शहर व तालुक्यातील अनेक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उप्परपिंड येथील शिवसेना (उबाठा गट) उपतालुका अध्यक्ष प्रशांत बाबुराव पाटील, दिनेश रमेश पाटील, खंडू वंजी पाटील, निंबा पाटील, दिनेश उत्तम पाटील, युवराज बाजीराव पाटील, विष्णू हिरामण भिल, धनराज भाईदास कोळी, विरसिंग राजेंद्र राजपूत, अमृत आनंदा पाटील, स्वप्नील दिलीप पाटील, गजेंद्र भगवान भिल, भाईदास सुका कोळी, राजेंद्र नथू पाटील, हरीश्चंद्र रविंद्र पाटील, सुनिल दाजभाऊ भिल, मनिष नागराज पाटील, उदेसिंग गोबा राजपूत, प्रविण आप्पा राजपूत, चेतन श्रीराम पाटील, प्रमोद झुंबरलाल कोळी, शशीकांत नानाभाऊ कोळी, दिलसिंग रामसिंग भिल, रोहित धनसिंग राजपूत, योगेश श्यामसिंग राजपूत, दरबार बारकू राजपूत, दारासिंग देविसिंग राजपूत, किशोर दादाभाई राजपूत यांच्यासह अनेक युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे उप्परपिंड परिसरात भारतीय जनता पक्षाचे काम मोठ्या जोमात करणार असल्याची भावना उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

## विजेच्या खेळखंडोब्यामुळे जनता त्रस्त एमआयएमचा आंदोलनाचा इशारा



**धुळे, दि.२९- शहरातील वार्ड क्र. एकोणावीस, चौदा, तेरा व पंधरा या परिसरातील वीजपूरवठा अनेक दिवसांपासून वारंवार खंडीत करण्यात येत आहे. तसेच रात्रीच्या वेळी कमी दाबाने वीज पुरवठा केला जात असल्याने विद्युत उपकरणे चालत नाही. वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा. अशा मागणीचे साकडे घालणारे निवेदन एमआयएम पक्षाच्या वतीने वीज वितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. वीज पूरवठा नियमित न झाल्यास वीज वितरणच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल. असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.**

निवेदनात नमुद केले आहे की, प्रभाग क्र. एकोणावीस, चौदा, तेरा व पंधरा च्या भागात संध्याकाळी व मध्यरात्रीच्या सुमारास वीज पुरवठा खंडीत होणे, कमी दाबाने वीजपुरवठ्याच्या समस्येला नागरिकांना सामोरे जावे लागते आहे. कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे फ्रिज, वॉटर पंप, एसी, संगणक व इतर विद्युत उपकरणे चालत नाही. यामुळे विद्युत उपकरणांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्या भागातील डी.पी.वर क्षमतेपेक्षा अधीक भार पडतो आहे.

वारंवार खंडीत होणारा वीज पुरवठा सुरळीत करावा, कमी दाबाने होणारा विद्युत पुरवठा सुरळीत करावा. डी.पी.ची क्षमता वाढवून नागरिकांची गैरसोय टाळावी. सुरळीत वीज पुरवठा न केल्यास एआयएमआयएम पक्षाच्यावतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा अ.लतीफ, सऊद सरदार, आमीर पठाण, शब्बीर पिंजारी, मुख्तार मन्सूरी, शोएब बेग मिर्झा, साजीद साई, वसीम मंत्री, जावीद बिल्डर, युसूफ मुल्ला यांनी दिला आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीच्या वेळेत बदल

नंदुरबार,दि.२९ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील नागरिकांना विविध प्रशासकीय, विकासात्मक आणि जनहिताच्या विषयांबाबत जिल्हाधिकाऱ्यांची भेट अधिक सुलभ व नियोजनबद्ध पद्धतीने घेता यावी, यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी भेटीच्या वेळापत्रकात बदल केला आहे.

या सुधारित वेळापत्रकानुसार ०१ जुलै २०२६ पासून प्रत्येक मंगळवार व गुरुवारी दुपारी १.०० ते २.०० या वेळेत नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेता येणार आहे. यापूर्वी ही भेट बुधवार व शुक्रवार या दिवशी त्याच वेळेत निश्चित करण्यात आली होती. सर्व विभागप्रमुखांनी या बदलाची माहिती आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना देऊन जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित बैठका, पत्रव्यवहार व भेटींचे नियोजन सुधारित वेळापत्रकानुसार करावे, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. विशेष व तातडीच्या प्रशासकीय प्रकरणांमध्ये आवश्यकतेनुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीने किंवा संबंधित शाखेमार्फत स्वतंत्र वेळ निश्चित करून भेटीचे नियोजन करता येणार आहे. हे सुधारित वेळापत्रक ०१ जुलै २०२६ पासून लागू होणार असून, यापूर्वीचे सर्व आदेश व सूचना रद्द समजण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी स्पष्ट केले आहे.

पान १ वरुन

## मोदी सरकारमधून सहा मंत्र्यांची उचलबांगडी होणार?

काही सध्याच्या मंत्र्यांनी आपल्या कामाची चमक दाखवली आहे, तसेच पक्षाच्या अंतर्गत गणितात त्यांचे स्थान मजबूत झाले आहे, अशा नेत्यांना प्रमोशन मिळू शकते. त्यात भाजपच्या काही वरिष्ठ नेत्यांना कॅबिनेट रँकमध्ये अधिक महत्त्वाचे स्थान दिले जाण्याची शक्यता आहे. अनुराग ठाकूर यांच्यासारख्या नेत्यांना अधिक मोठ्या भूमिकेत आणले जाऊ शकते. काही राज्यमंत्र्यांना त्यांच्या चांगल्या कामगिरीचे बक्षीस म्हणून स्वतंत्र प्रभार किंवा थेट कॅबिनेट मंत्री म्हणून बढती मिळण्याची शक्यता आहे. सध्याच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे सध्या मोठी जबाबदारी आहे, मात्र सूत्रांच्या हवाल्याने आलेल्या माहितीनुसार, आरबीआयचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास देशाचे नवे अर्थमंत्री बनू शकतात. धर्मेंद्र प्रधान यांच्या संभाव्य एक्झिटनंतर, शिक्षण खात्याची धुरा निर्मला सीतारामन यांच्याकडे सोपवली जाऊ शकते, अशीही दिल्लीच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान मोदी यांच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याशी झालेल्या लागोपाठच्या बैठकांनंतर हे स्पष्ट झाले आहे की, अनेक बड्या मंत्रालयांच्या (उदा. पेट्रोलियम, उड्डयन, संरक्षण किंवा गृहनिर्माण) खात्यांमध्ये फेरबदल केला जाणार आहे.

## भाजपाचे ज्येष्ठ नेते दयानंद मेहतांचा

यात्रसंगी बोलताना आ. अनूप अग्रवाल यांनी जुन्या राजकीय आठवणींना उजाळा देत त्यांचे वडील श्री. ओमप्रकाशजी अग्रवाल आणि दयानंदजी मेहता यांच्यातील सके्हसंबंध, त्या काळातील राजकीय परिस्थिती, भाजपाचे अवघे चार नगरसेवक असतानाही दयानंदजींनी निभावलेली किंगमेकरची भूमिका, पक्षासाठी घेतलेली अथक मेहनत, त्याग आणि निःस्वार्थ समर्पण यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. तसेच दयानंदजींना निरोगी, दीर्घायुषी आणि शतायुषी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. मदनलालजी मिश्रा यांनी जनसंघाच्या अत्यंत प्रतिकूल काळात, कुमारनगर नगरपालिकेच्या हद्दीत नसतानाही शहरातून दयानंदजी मेहता निवडून आले होते, याची आठवण करून देत त्यांची पक्षनिष्ठा, साधी राहणी आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यावर प्रकाश टाकला. भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. गजेंद्र अंपळकर यांनी दयानंदजींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या प्रदीर्घ राजकीय आणि सामाजिक कार्याचा गौरव केला. तसेच दयानंदजींचे सुरुवातीपासूनचे सहकारी व ज्येष्ठ भाजपा नेते श्री. ओमप्रकाशजी अग्रवाल यांनीही त्यांच्या कार्याचा गौरव करून शुभेच्छा व्यक्त केल्या. या सोहळ्यास श्री. रवि बेलपाठक, पूज्य बहावलपुरी पंचायत अध्यक्ष श्री. ललित तनेजा, अखिल भारतीय बहावलपूर महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुशील पोपली, माजी महापौर मोहन नवले, जयश्री अहिरराव, नगरसेवक सुनील बैसाणे, राकेश कुलेवार, भिकन वराडे, नगरसेवक ललित आरुजा, धीरज परदेशी, नीलेश नेमाणे, संजय बोरसे, भीमसिंग राजपूत, विजय पाछापूरकर, जगदीश देवपूरकर, अनिल थोरात यांच्यासह पूज्य बहावलपुरी पंचायतचे पदाधिकारी, सहजीवन ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य, नातेवाईक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माजी नगरसेवक हर्षकुमार रेलन यांनी केले. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक होते. उपस्थितांनी दयानंदजी मेहता यांच्या दीर्घ, निःस्वार्थ आणि प्रेरणादायी सामाजिक व राजकीय कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांना निरोगी, शतायुषी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

## प्रश्नपत्रिका आग्रा येथे का छापल्या?

नोटा महाराष्ट्रात छापल्या जातात मग टीईटीच्या प्रश्नपत्रिका आग्रा येथे का छापल्या, असा खोचक सवाल उपस्थित करुन मुनगंटीवार यांनी चांगलीच पोलखोल केली. टीईटी पेपरफुटीच्या प्रकरणावर आज विधिमंडळात चर्चा झाली. यावेळी बोलताना शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी म्हटले की, टीईटी पेपर फुटीबाबत माहिती मिळताच, पेपर विक्री करण्यासाठी येणाऱ्या तिघांना पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे टीईटीचे पेपर आढळले. राजू प्रयाग शाम आणि आणखी दोघांवर भिवंडी कोनगाव येथे गुन्हा दाखल केला आहे.

### पुढील वर्षीपासून परीक्षा ऑनलाईन

मंत्री भुसे यांनी सांगितले की, मोठी रक्कम घेऊन हे पेपर विक्री करणार होते. या गुन्ह्यात तीन संशयित आरोपींना २७ जूनला अटक केली आहे. पोलिस आयुक्त गुन्हे शाखा, ठाणे यांची एसआयटी स्थापन केली आहे. हरियाणा, बिहार आणि दिल्लीला तपासासाठी पथके रवाना झाली आहेत. या प्रकरणात मकोका लावण्याच्या संदर्भात तपासणी सुरु आहे. आता फेर पेपरसाठी कोणताही शुल्क घेतल जाणार नाही. पुढील परीक्षा पारदर्शक आणि ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली जाणार आहे.

### नोटा छापतात, प्रश्नपत्रिका का नाही

आमदार सुधीर मुनगंटीवार प्रकरणावर म्हणाले की, टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका आग्र्यात का छापल्या जात आहेत? जर विश्वास ठेवून नाशिकमध्ये नोटा छापल्या जात असतील तर प्रश्नपत्रिका आग्र्यात का छापल्या जातात? असा प्रश्न विचारला. यावर बोलताना परीक्षा पारदर्शकपणे होण्याकरता समिती नेमली जात आहे. येथून पुढे परीक्षा प्रक्रिया आणि पेपर हा ऑनलाईन पद्धतीने घेतला जाईल.

## संत कबीर यांचा प्रकट दिन उत्साहात साजरा

धुळे,दि.२९- धुळे शहरातील चाळीसगाव रोडवरील सद्गुरू कबीर साहेब चौक येथे सोमवार (दि. २९ जून) रोजी विश्ववंदनीय संत शिरोमणी सद्गुरू कबीर साहेब यांचा ६२८ वा प्रकट दिवस महोत्सव भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परमपूज्य पंथ श्री हुजूर प्रकाशमुनी नाम साहेबजी यांच्या असीम कृपेने तसेच परमपूज्य पंथ श्री हुजूर उदितमुनी नाम साहेबजी आणि गुरुगोसाई डॉ. भानुप्रताप साहेबजी यांच्या प्रेरणेने आयोजित या महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. धुळे जिल्ह्याच्या आदरणीय महंत शोभादास माताजी यांच्या सानिध्यात तसेच एस.के.डी. व्ही. मिशन समिती, महाराष्ट्रचे उपप्रांत प्रतिनिधी अविनाश लोकरे यांच्या अध्यक्षतेखाली हा धार्मिक सोहळा पार पडला.

यावेळी एस.के.डी.व्ही. मिशन समिती, धुळे जिल्ह्याचे जगदीश लाडे, योगेश कांबळे, अनिल गवळी, वरिष्ठ पंडित घोरपडे, सत्यवान पाटील, निलेश ढोले, पंकज फुलपगारे, नितीन फुलपगारे, मनोज राणा, भूषण गवळी, गणेश येलपले तसेच आमीन माता महिला मंडळाच्या ताराबाई पवार, सुशीलाबाई शेवतकर, शकुंतला खोपडे, उषा लोकरे, कमल माईणकर, उषा जीरेकर, मनीषा अजळकर, शीतल जांभळे, प्रभा चौगुले, लक्ष्मी शेंडे, सुनीता अजळकर, लता येलपले, रेश्मा पाटील यांच्यासह अनेक मान्यवर, श्रद्धाळू आणि नागरिक उपस्थित होते.

✲ **धुळे-** शहरातील गणपती मंदिर ते श्री स्वामी समर्थ मंदिरा पर्यंत रस्ता काँक्रिटीकरणाचे काम संथ गतीने सुरू असल्याने एस.टी.बसेस व इतर वाहतुक वळविण्यात आली आहे. रस्त्याचे काम वेगात करून वाहतुक सुरळीत करण्याची मागणी होत आहे.


प्रकाश में आज




रेखा, राजेश खन्ना, मौसमी चॅटर्जी, हेलन, प्रेमा नारायण, केष्टो मुखर्जी

BOOKING OPENS

ज्योती सिनेमा 3D JYOTI

DOLBY DIGITAL PLUS




ता. २६ से रोज ४ खेल टा. १२,३,६,९ बजे

(हिंदी मध्ये) वेलकम टू द जंगल

bookmyshow

9422789999/9823177599 Jyoticinemadhule.


## शब्दकोडे क्रमांक : २४००

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ७ | |
| ८ | | ■ | ९ | | | ■ | १० | ■ | ११ | | ■ |
| | ■ | १२ | | | ■ | १३ | | | ■ | १४ | १५ |
| ■ | १६ | | | ■ | १७ | ■ | | ■ | १८ | ■ | |
| १९ | | | ■ | २० | | २१ | ■ | २२ | | २३ | ■ |
| ■ | | ■ | २४ | | ■ | २५ | २६ | ■ | २७ | | |
| २८ | ■ | २९ | | ■ | ३० | | | ३१ | ■ | | ■ |
| ३२ | ३३ | | ■ | ३४ | | ■ | ३५ | | | ■ | ३६ |
| ■ | ३७ | | ३८ | | ■ | ३९ | ■ | | ■ | ४० | |
| ४१ | | ■ | | ■ | ४२ | | | ■ | ४३ | | ■ |
| | ■ | ४४ | | ४५ | ■ | | ■ | ४६ | ■ | ४७ | |
| ४८ | | | ■ | ४९ | | ■ | ५० | | | | ■ |

**आडवे शब्द :** १.रक्षण करणारा ३.एक पालेभाजी ५.हवामानाचा अंदाज वर्तवणारी संस्था ८.अनावश्यक गवत ९.पतीची दुसरी पत्नी ११.ढीग १२.वस्तू १३.अक्षरावर मारतात ती टोपी १४.फायदा १६.करण्यास सोपे १९.प्रयत्न २०.बोर्ड २२.प्रजा २४.अंतरंगातील दुःख २५.तामी-उलट लिहा २७.हिंदीत-घर २९.करार ३०.तडजोड ३२.निर्णय ३४.तंतू ३५.उत्तर ३७.शाहरुख खान,जुही चावला यांचा एक सिनेमा ४०.लग्न न झालेला ४१.हिंदीत-पत्ता ४२.पैलवानाचे खाद्य ४३.रचयिता ४४.कारणीभूत ठरलेला ४७.मोठा ४८.सुरक्षा वेष्टन ४९.लहान डाव ५०.स्वीकृती

**उभे शब्द :** १.रत्न २.पल ३.पवित्र ४.तलब ६.धरती ७.राज्य ९.आपल्या सभोवतालचे विश्व१०.हिंदीत-उडी१२.धैर्य१५.खूप१६.एक मराठी,हिंदी,दाक्षिणात्यअभिनेता-'***शिंदे'१७.इंग्रजीत-पत्र१८.धीर२०.फळ२१.अंगरखा २३.पिच्छा पुरवणे २४.सोबत २६.गळ्यात घालतात ते लॉकेट २८.लवण २९.काकडी ३०.नौका ३१.जीभ-हिंदीत ३३.मोहरी घातलेले एक प्रकारचे तोंडी लावणे ३४.साथ मिनिटांचा काळ ३६.पागल३८.गोलंदाज-इंग्रजीत३९.घरातलागणारे सामान,जिन्नस,वस्तू ४०.एक गोड पेय ४१.बक्षीस,सन्मानचिन्ह ४४.आरसा बनवण्यासाठी वापरतात ४५.चहा पिण्याचे पात्र ४६.रीघ

### शब्दकोडे क्रमांक : २३९९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | प | का | र | ■ | सा | ■ | बे | प | र्वा | ■ | वे |
| ता | ■ | ठ | ■ | का | व | ळा | ■ | गा | ■ | पा | त |
| र | सा | ■ | व | म | न | ■ | आ | र | मा | र | ■ |
| ■ | द | वा | खा | ना | ■ | सा | ठ | ■ | स | ध | न |
| अ | ■ | ह | र | ■ | पा | प | ■ | क | ळी | ■ | ग |
| च | म | क | ■ | ता | ठ | ■ | वा | या | ■ | मो | द |
| र | सा | ■ | शो | र | ■ | प | ■ | स | ब | ब | ■ |
| ण | ■ | बा | क | ■ | मा | द | क | ■ | स | द | र |
| ■ | दे | व | ■ | वा | व | र | ■ | की | ■ | ला | ■ |
| ओ | वा | ळ | णी | ■ | स | मो | र | ■ | गो | ■ | स |
| ळ | ■ | ट | ■ | सं | ■ | ड | ■ | अ | मा | न | त |
| ख | डा | ■ | प | थ | क | ■ | क्यू | ■ | ता | ■ | त |




# जात पडताळणी त्रुटी पुर्ततेसाठी १ व २ जुलै रोजी शिबिराचे आयोजन

**धुळे, दि. २९- राजर्षी शाहू महाराज जयंती पर्वा निमित्त धुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयामार्फत १ जुलै व २ जुलै, २०२६ दरम्यान विशेष त्रुटी पुर्तता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव योगेश पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त होण्यासाठी हे शिबिर राबविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे जात प्रमाणपत्र पडताळणीची अर्जदारस्तरावर प्रलंबित प्रकरणांचाही निपटारा यावेळी करण्यात येणार आहे.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे येथे जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रकरणे त्रुटींच्या पुर्ततेअभावी अर्जदारस्तरावर प्रलंबित आहेत. अशा अर्जदारांना नोंदणी केलेल्या ईमेलवर त्रुटींचा कळविण्यात आल्या असून ज्यांनी अद्यापपर्यंत त्रुटींचीपुर्तता केली नाही. अशा अर्जदारांनी त्रुटी दूर करण्यासाठी मूळ कागदपत्रांसह कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,सिंचनभवन मागे, साक्री रोड, धुळे येथील नागरी सुविधा केंद्रात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे.

अर्जदारानी वरील कालावधीत त्रुटींची/आक्षेपांची पुर्तता न केल्यास त्यांच्या प्रकरणांवर नियमानुसार निकाली काढण्यात येईल. तसेच कोणत्याही अर्जदाराने त्रयस्थ व्यक्तीकडे संपर्क करु नये व त्रयस्थ व्यक्तीच्या आमिषास बळी पडू नये, असे आवाहन जात पडताळणी समितीचे अध्यक्ष उन्मेश महाजन, उपायुक्त श्रीमती अमिना शेख तसेच संशोधन अधिकारी योगेश पाटील यांनी केले आहे.

**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY NAME FROM **RAHIL AHMAD NAIMODDIN** TO **RAHIL AHMED NAIMODDIN SHAIKH**

ADD- PLOT NO.79/B, TAMIJ, AISHKAR COLONY, CHLISGAON ROAD, DHULE-424001.

# अन्न व्यवसायिकांची बैठक उत्साहात संपन्न

धुळे, दि. २९- सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र मोहिमेअंतर्गत अन्न सुरक्षा विषयक जनजागृती व नियमांची माहिती देण्यासाठी शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, उपहारगृह, क्लब आणि कॅन्टीन क्षेत्रातील अन्न व्यवसायिकांची बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीस सहायक आयुक्त (अन्न) गोपाल माहोरे, अन्न सुरक्षा अधिकारी आनंद पवार, शशिकांत राणे, अरविंद राऊत यांच्यासह अन्न व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष, सचिव तसेच सभासद उपस्थित होते. अशी माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त (अन्न) गोपाल माहोरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

**SATGURU PUBLIC SCHOOL**
**(English Medium Residential School)**

Teachers are required for below post

PRT- Primary teacher

TGT- Marathi/English/Maths/Science

* Candidates must be fluent in English
* Freshers can also apply
* Pickup and drop facility available for female teacher's

**Contact : 9850731636, 9112453988**

Address: Satguru Public School, Near Naval nagar, Dhule.

**PRINCIPAL**
**SATGURU PUBLIC SCHOOL**




# राम मंदिरात एक ह. कोटीचा दरोडा मविआतर्फे आरती व केंद्राचा निषेध

**धुळे, दि.२९- अयोध्येतील श्रीराम मंदिरात एक हजार कोटींचा दरोडा टाकल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांकडून आग्रारोडवरील श्रीराम मंदिरात आरती करून केंद्र सरकारच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली.**

श्रीराम मंदिरारातील दानपेटीतील रकमेत अफरातफर करण्यात आल्याचे वृत्त सर्वत्र पसरले. त्याअनुषंगाने संबंधितांनी राजीनामाही दिला. श्रीराम मंदिरात लूट करणाऱ्यांच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येवून निषेध केला. यावेळी काँग्रेसचे युवराज करनकाळ यांनी सांगितले की, रामाच्या नावावर मत मागतात आणि रामाच्या मंदिरात चोरी करतात. चोरी करणाऱ्यांना पाठींबा देणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा निषेध करण्यासाठी व प्रभु श्रीरामाची क्षमा मागण्यासाठी आरती करण्यासाठी आग्रा रोडवरील श्रीराम मंदिरात आलो असल्याचे स्पष्ट केले. यावेळी शिवसेना उबाठाच्या शुभांगी पाटील, तेजस गोटे, अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी, धिरज पाटील, निंबा मराठे, डॉ.अनिल पाटील, सागर निकम, सागर साळूंके, अण्णा फुलपगारे, सुरज भावसार, महारू गवळी, मिलिंद मुंदडा, मनोज बंब, सुनिल चौधरी, प्रशांत ठाकूर, काँग्रेसचे कमिटीचे युवराज करनकाळ, गुलाबराव कोतेकर, रमेश श्रीखंडे, राजेंद्र खैरनार, रविंद्र चौधरी, विलास पाटील, पितांबर महाले, कल्पना गुरव, भावना गिरासे, अलका बिऱ्हाडे, सुनिता मांडगे, कन्हैय्या अहिरे, चिंतामण ताकटे, दीपक पाटील, प्रेम सोनार, कृष्णा ठाकूर, धनंजय गाळणकर, किशोर वाळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे वल्मिक मराठे एकत्र येवून त्या ठिकाणी आरतीत सहभागी झाले. आरती नंतर आग्रारोडवर महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या विरोधात घोषणा बाजी केली.




# होळच्या वारकरी दिंडीचे भव्य स्वागत आरोग्य तपासणी व रेनकोटचे वाटप

**धुळे, दि.२९ - शिंदखेडा तालुक्यातील होळ येथील स्वर्गीय ह.भ.प. तुळशीराम बाबा पाटील यांच्या स्मरणार्थ गेल्या सुमारे ५० वर्षांपासून पंढरपूरकडे पायी निघणाऱ्या वारकरी दिंडीचे रविवारी (दि. २८) धुळ्यात उत्साहात स्वागत करण्यात आले. सुमारे ११० वारकऱ्यांचा समावेश असलेल्या या दिंडीचे विविध गावांमध्ये स्वागत केले जात असून, धुळ्यात कान्हादेश वारकरी सेवा मंडळ व आमदार अनुप अग्रवाल यांच्या ए.बी. फाउंडेशनच्या वतीने विशेष सेवा उपक्रम राबविण्यात आला.**

गल्ली क्रमांक ५ येथील कान्हादेश वारकरी सेवा मंडळाच्या कार्यालयात वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. तसेच पावसाळ्याचा विचार करून प्रत्येक वारकऱ्याला प्लास्टिक रेनकोट, आरोग्य तपासणी करून औषधांचे किट वितरित करण्यात आले.

यावेळी मबेटी बचाव, बेटी पढावफ अभियानाच्या प्रदेश उपाध्यक्ष सौ. अल्पा अनुप अग्रवाल यांच्या हस्ते वारकऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यांनी वारकऱ्यांना औषध किटचेही वितरण केले. कार्यक्रमास कान्हादेश वारकरी सेवा मंडळाचे सुधाकर बापू भोकरे, सचिव सुनीलभाऊ वाघ, विश्वस्त प्रकाश विभांडिक, कैलास पवार, आर. जी. पाटील, धनराज माळी, विनोद पवार (अमळथे), पी. एन. खैरनार, जिल्हाध्यक्ष शोभा जगताप, सुनील शिंदे, किरण भारती, यशवंत पाटील, कुमार मराठे, देविदास मराठे, बबलू पाटील, दगडू नाना, भद्रे महाराज, कांतीलाल सोनार, रवींद्र धनगर, राजू पाटील, योगीराज पाटील, सुरेश पाटील, ए.बी. फाउंडेशनचे कमलेश देवरे यांच्यासह धुळे जिल्ह्यातील वारकरी संप्रदायाचे अनेक पदाधिकारी व भाविक उपस्थित होते.

या सेवा उपक्रमाबद्दल वारकऱ्यांनी आयोजकांचे आभार मानले. पंढरपूरच्या वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सौंदाणे येथील महानगरपालिका हद्दीबाहेरील.

गट नं.३०३/३ पैकी प्लॉटस

१) प्लॉट नं.१३८ चे एकूण क्षेत्र ५०.०० चौ.मी. बखळ प्लॉट. २) प्लॉट नं.१३९ चे एकूण क्षेत्र ५०.०० चौ.मी. बखळ प्लॉट. ३) प्लॉट नं.१४० चे एकूण क्षेत्र ६०.०० चौ.मी. बखळ प्लॉट. हे १) मोहसीन खान आलम खान पठाण रा. प्लॉट नं.७६, गफुर नगर, वडजाई रोड, धुळे २) हाजी कासिम फारूक अन्सारी रा. धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजुर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक १) मोहसीन खान आलम खान पठाण २) हाजी कासिम फारूक अन्सारी यांचे तर्फे जनरल मुखत्यार म्हणून मजहर खान आलम खान पठाण रा. प्लॉट नं.७६, गफुर नगर, वडजाई रोड, धुळे यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे, दिनांक:- २९/०६/२०२६.

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे.
**मो.नं.९८८१९२९४२४**

## जाहीर नोटीस

तमाम जनता सर्व वित्तीय कंपन्या, बँका, पतसंस्था, इत्यादी यांना आमचे अशिलातर्फे सदर जाहीर नोटीसीने सुचित करण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत खरेदी देण्याचा सौदा सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार म्हणून श्री. विनोद रमेश थोरात (चौधरी) रा. पाण्याच्या टाकीजवळ मनमाड जीन, ८० फुटी रोड, धुळे यांनी आमचे अशिलासोबत केला असून बयाणा देखील घेतला आहे. त्या अनुषंगाने पुढील आर्थिक व्यवहार व दस्तऐवज नोंदण्याची पूर्तता आमचे अशिल लवकरच करणार आहे.

सबब खालील वर्णनाच्या मिळकतीच्या खरेदी विक्री व्यवहारास, मालकी हक्काबाबत व कब्जे हक्काबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अगर सदर मिळकतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, अधिकार, हितसंबंध, गहाण, तारण, बोझा, जामीन, सौदेकरार, कोर्ट कचेरी असल्यास त्यांनी हक्काच्या कायदेशीर कागदपत्रांसह खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या मुदतीत तथाकथित हक्काच्या कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी. परस्पर दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेली हरकत ग्राह्य धरण्यात येणार नाही.

नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत खालील पत्त्यावर हक्काच्या कागदपत्रांसह प्राप्त न झाल्यास खालील मिळकत निर्बोझ व निर्वेध असून ती प्रत्येक कब्जे उपभोगासह विक्रीने हस्तांतरण करण्याचा वरील व्यक्तीस कायदेशीर अधिकार आहे असे मानुन आमचे अशिल वरील व्यक्तीशी खालील वर्णनाच्या मिळकतीसंबंधी आर्थिक व्यवहार तसेच खरेदी विक्रीचा दस्त नोंदण्याची पूर्तता पूर्ण करतील. त्यानंतर कोणीही खालील मिळकतीबाबत कोणतेही तथाकथित हक्क व अधिकार दाखविल्यास व वाद उपस्थित केल्यास ते आमचे अशिलांवर तसेच खालील मिळकतींवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :** धुळे शहर व धुळे महानगरपालिका हद्दीतील ८० फुटी रोड लगत असलेल्या सर्व्हे नं. ३४६अ फायनल प्लॉट नं. ५२ म्हणजेच सि. स. नं. ४६९०/१ पैकी प्लॉट नं. ४७ चे एकूण क्षेत्र ६०३.८० चौ.मी. (६५०० चौ. फुट) पैकी दक्षिणेकडील निम्मे भाग म्हणजे ३०१.९० चौ.मी. (३२५० चौ. फुट) सत्ता प्रकार क यासी चतु:सिमा व मापे पुर्वेस : प्लॉट नं. ४६ व माप ३२.५ फुट, पश्चिमेस : रस्ता व वापर, माप ३२.५ फुट, दक्षिणेस : प्लॉट नं. ४८ व माप १०० फुट, उत्तरेस : प्लॉट नं. ४७ चा उर्वरित :भाग व माप १०० फुट.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीच्या आधारे त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे दि. २७/०६/२०२६

**ॲड.संकेत एम. जैन**
श्री पद्मप्रभु दिगंबर जैन मंदिराजवळ, वाखारकर नगरच्या पुढे मार्केट यार्ड, धुळे ४२४००४ मो. ९३७३९९९९९१/९८५०९६४५१२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे देवपूर येथील स. नं. ५१/१ यापैकी प्लॉट नं. ७८ चे एकूण क्षेत्र २८७.९९ चौ. मी. बखळ प्लॉट यास लागू विस्तारीत सि. स. नं. ४३६१ चे एकूण क्षेत्र ३००.१० चौ. मी. बखळ प्लॉट.

यासी मापे व चतु:सिमा.

| दिशा | मापे | चतु:सिमा |
|---|---|---|
| पुर्वेस : | १९.२० मीटर | प्लॉट नं.७६ |
| पश्चिमेस: | १९.२० मीटर | प्लॉट नं.८० |
| दक्षिणेस : | १५.०० मीटर | प्लॉट नं.७७ |
| उत्तरेस : | १५.०० मीटर | वापर व रस्ता |

सदर मिळकत गुलाबराव भिला पाटील रा. मु. पो. कापडणे ता. जि. धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यांनी उपरोक्त मिळकत कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकत लवकरच खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी, हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार, असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदर मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणतीही हरकत असल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. २९/०५/२०२६

**ॲड.चेतन महादु यादव**
ऑफिस : सि. स. नं. २५९७/अ
श्रीसदगुरु सदन, गल्ली नं. ५,
मिरच्या मारुती चौक, धुळे
मो. ९६८९१२४६९२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सौंदाणे येथील महानगरपालिका हद्दीबाहेरील.

गट नं.३०३/३ पैकी प्लॉट नं.१३७ चे एकूण क्षेत्र ५०.०० चौ.मी. बखळ प्लॉट. हे सुलतानाबी साबीर पठाण रा. प्लॉट नं.७६, गफुर नगर, वडजाई रोड, धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजुर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक सुलतानाबी साबीर पठाण यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दिनांक:- २९/०६/२०२६.
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे.
**मो.नं.९८८१९२९४२४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संबधितांना प्रस्तुतच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तु.जि.धुळे पो.तु.ता. शिरपूर पैकी मौजे न्यू बोराडी येथिल ग्रां.पं. हद्दीतील ग्रा.पं.. मिळकत क्र.१२५१/१ चे एकूण क्षेत्र ९९० चौ.फु. (४५२२ फु.) यात मिळकत यासी चतु:सिमा-

पुर्वेस- रस्ता,
पश्चिमेस- झिना उकाऱ्या पावरा,
दक्षिणेस- राजु विरजी पावरा,
उत्तरेस- मगन दशरथ पावरा

येणेप्रमाणे चतु:सिमांकित मिळकत ही जगन दयाराम पावरा यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील असून सदर मिळकतीवर ते पिरॅमल फायनान्स लि. शाखा शिरपुर यांचेकडून कर्ज घेत आहे. तरी, सदर वर नमूद मिळकतीबाबत तारण, गहाण, लिज, जप्ती, भाडेपट्टा, सरकारी, निमसरकारी, वैयक्तिक कर्ज, वारस, दावे-फाटे, सौदापावती इ. कोणत्याही स्वरुपाचा हितसंबंध असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी. विहीत मुदतीत कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची लेखी हरकत न आल्यास सदर वर नमूद मिळकत निर्वेध व निर्बोज समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकती, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकती व तोंडी हरकती यांची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. तसेच ते आमचे अशिल जगन दयाराम पावरा व वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती, दस्तऐवज, अधिकारावरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे, दि.२९/०६/२०२६.

**ॲड.सागर पी.सोनवणे**
४, शिव कॉलनी, मार्केट यार्ड,
पारोळा रोड, धुळे.
**मो.नं.९४२०३७३५३०**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** : मौजे शिरुड ता. जि. धुळे येथील भूमापन क्र. व उपविभाग ७९४/१ चे ला. ला. क्षेत्र ०० हे. ८५ आर व पो. ख. ० हे. ०० आर. असे एकूण क्षेत्र ०० हे. ८५ आर चा आकार ३ रु. १० पैसे यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ला. ला. क्षेत्र ०० हे. ३९ आर. व पो. ख. ० हे. ०० आर असे एकूण क्षेत्र ०० हे. ३९ आर. चा आकार १ रु. ४२ पैसे अशा वर्णनाची जिरायत शेतजमीन मिळकत यास जुन्या वहिवाटीप्रमाणे कायमस्वरुपी वापर रस्ता आहे व राहील. तसेच सदर गटात विहिर असून त्यातून पाणी घेण्याच्या हक्कासह. यासी चतु:सिमा.

**पुर्वेस : वसंत धुकडू पाटील यांचे शेत/गट नं. ७९३, पश्चिमेस : रस्ता/नॅशनल हायवे, दक्षिणेस : राजेश अग्रवाल यांचे शेत/गट नं. ७९४/२, उत्तरेस : या गटाचा उर्वरित भाग/गटनं. ७९४/१/१.**

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या आतील मिळकत ही श्री. हेमराज लक्ष्मण गवळी रा. मु. पो. बोरविहीर ता. जि. धुळे यांच्या मालकीच्या व ताबे उपभोगातील असून यांच्याकडून सदर मिळकती या आमचे अशिल यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदा पोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत तक्रार न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज, निर्वेध व श्री. हेमराज लक्ष्मण गवळी रा. धुळे ता.जि. धुळे यांच्या मालकीच्या व ताबे उपभोगातील असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. २९/०६/२०२६

**ॲड. ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाल
बिल्डींग जवळ, मिल परिसर, धुळे
मो. ९४२२७७१२७४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे फागणे ता. जि. ग्रा. पा. हद्दीतील गट नं. ४०१/२/अ पैकी प्लॉट नं. ४५ चे एकूण क्षेत्र १६० चौ.मी. असा बखळ प्लॉट तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो माझे मालकीचा प्लॉटची चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.

वर नमूद वर्णन केलेला बखळ प्लॉट/मिळकत ही प्रियंका अमित चौधरी रा. रहाटणी, पुणे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे ताबे उपभोगातील आहे. सदरचे बखळ प्लॉट/मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बखळ प्लॉट/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकती ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे.

धुळे दि. २९/०६/२०२६

**ॲड. लखमीचंद अ. गुजर**
ॲडव्होकेट व नोटरी
ग. नं. २, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे
मो. ९४२३४९३०८९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे फागणे ता. जि. ग्रा. पा. हद्दीतील गट नं. ४०१/२/अ पैकी प्लॉट नं. १३ चे एकूण क्षेत्र २४६ चौ.मी. आणि प्लॉट नंबर ४६ चे एकूण क्षेत्र १६० चौ. मी. असे दोन्ही बखळ प्लॉट तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो माझे मालकीचा प्लॉटची चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.

वर नमूद वर्णन केलेला बखळ प्लॉट/मिळकत ही सौ. कल्पना भटा चौधरी रा. देवपूर धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरचे प्लॉट/मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बखळ प्लॉट/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकती ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे.

धुळे दि. २९/०६/२०२६

**ॲड. लखमीचंद अ. गुजर**
ॲडव्होकेट व नोटरी
ग. नं. २, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे
मो. ९४२३४९३०८९

## जाहीर नोटीस

ॲड.प्रशांत के.पाटील, धुळे

**मे.उपविभागीय अधिकारी सो., धुळे यांचे कोर्टात**

आरटीएस/अतिक्रमण अर्ज नं.१६५/२०२५

१. मंगला रामदास चौधरी, २. ओमप्रकाश नथमल भट्टड,
३. सुनंदा सुभाष चौधरी, ४. भुषण सुभाष चौधरी,
५. हर्षल सुभाष चौधरी ....**अर्जदार**

**विरूध्द**

१. अनिल मेकचंद विसपुते, २. यशोदा उत्तम विकणे,
रा.प्लॉट नं.७०, पवन नगर, दाता सरकार,
मंगल कार्यालय जवळ, कॉटन मार्केटच्या मागे,
पारोळा रोड, धुळे, ता.जि.धुळे.
३. वर्षा मोहन चौधरी,
रा.प्लॉट नं.७०, पवन नगर, दाता सरकार,
मंगल कार्यालय जवळ, कॉटन मार्केटच्या मागे,
पारोळा रोड, धुळे, ता.जि.धुळे.
४. दत्तात्रय गंगाराम जिवरक ....**सामनेवाला**

सामनेवाले नं.२ यशोदा उत्तम चिकणे, व सामनेवाले नं.३ वर्षा मोहन चौधरी यांना कळविण्यात येते की, तुमचे नाव अपील कामी समाविष्ट करण्यात आले आहे. सदर कामी आपण सामनेवाले नं.२ व ३ आहात सदर नोटीसीच्या अनुषंगाने मे.उपविभागीय अधिकार सो. धुळे यांचे कोर्टात दिनांक-१३/०७/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता हजर राहावे. अन्यथा सदर अपील कामी आपले काही म्हणणे नाही म्हणून आपल्या विरूध्द एकतर्फा सुनावणी होईल.

येणे जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी आज दिनांक- २९/०६/२०२६ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- २९/६/२०२६

आदेशावरून

**कामगिरी कारकून** (शिक्का) **सहा. अधिक्षक**
**मे.उपविभागीय अधिकारी सो. धुळे**

## शिरपूर येथील म. तहसिलदार सो. तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात

### नोटीस - जाहीरनामा

जन्म अर्ज नं. /२०२४

**श्री. शांतीलाल नागो भिल** उ.व. ४३, धंदा : मजुरी
रा. मु. पो. वरझडी ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार

विरुद्ध

**म. सरपंच सो.**
**ग्रामपंचायत वरझडी, ता.शिरपूर जि.धुळे ... जाबदेणार**

ज्या अर्थी अर्जदार यांनी म. तहसीलदार सो. शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदाराची सविता शांतीलाल भिल हिचा जन्म दि. २५/०३/२००७ रोजी मौजे मु. पारशीपाडा पो. वरझडी ता. शिरपूर जि. धुळे येथे राहत्या घरी झाल्यामुळे जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज केलेला आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांकापासून त्यांनी ०८ दिवसांच्या आत कार्यकारी दंडाधिकारी, शिरपूर यांच्या न्यायालयात स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर करावयात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन वर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल. दि. २७/६/२०२६ ठिकाण : शिरपूर

**ॲड. जितेंद्र बी. पवार,**
३३२,राजगृह क्रांती नगर, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५४६/२०२६

**१) गोरख पुना तांबोळी, २) नेहा गोरख तांबोळी,**
**३) अंजली गोरख तांबोळी,**
(अ. नं. १ स्वत:साठी अ. नं. ३ साठी अ. पा. क. वडील म्हणून)
सर्व रा. वाल्मिक नगर, करवंद रोड, ता. शिरपूर जि. धुळे.).... **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही .... जाबदेणार**

X

**संगीता गोरख तांबोळी,** मृत्यू ०८/०४/२०२६
रा. वाल्मिक नगर, करवंद रोड, ता. शिरपूर जि. धुळे.) ... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत नामे संगीता गोरख तांबोळी हे दि. ०८/०४/२०२६ रोजी मौजे वाल्मिक नगर, करवंद रोड, ता. शिरपूर जि. धुळे. येथे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारिक कारणासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. २३/७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## पाहिजेत

अंजुमन फरोगे तालीम, धुळे या अल्पसंख्यांक/अल्पभाषिक संस्था संचलित नॅशनल उर्दू हायस्कूल & ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स, आझादनगर धुळे या उर्दू माध्यमाच्या शाळेत मराठी भाषा फाउंडेशन वर्ग अंतर्गत विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी उत्साही, मेहनती आणि प्रतिभावान शिक्षकाची कंत्राटी पध्दतीने शासनमान्य मानधनावर नियुक्ती करावयाची आहे.

| अ. नं. | तपशिल | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | मानधन | अटी व शर्ती |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी भाषा फांउडेशन वर्ग अंतर्गत मराठी भाषा विषय शिक्षक | २ पद | बी.ए./एम.ए. (मराठी स्पेशल) बी.एड | शासनमान्य मानधन रु.५०००/- दरमहा | १ जुलै २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती राहिल. |

वरील तपशिलाप्रमाणे पात्र व लायक उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेचे मुळ कागदपत्रे, बायोडाटा, पासपोर्ट आकाराचा फोटो व अर्जासह दुपारी १२ ते ५ या वेळेत मुख्याध्यापक कार्यालय नॅशनल उर्दू हायस्कुल ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स, आजादनगर, धुळे येथे हजर रहावे.

**मसुद इकबाल महंमद आबिद**
**मुख्याध्यापक तथा सचिव, शालेय समिती**
**नॅशनल उर्दू हायस्कुल & ज्यु.कॉलेज, धुळे.**

# आ.अग्रवालांच्या संकल्पनेतून धुळ्याचे विकासरूपी परिवर्तन घडून येत आहे - पालकमंत्री ना.रावल

धुळे, दि.२९- धुळे शहर जिल्ह्याची राजधानी आहे. मात्र, विरोधकांच्या सत्तेच्या काळात शहराची सतत बदनामी होत राहिली. वर्षानुवर्षे धुळ्यावर टीका होत राहिली. मात्र, परिवर्तन हे अटळ असते. त्यानुसार मतदारांनी परिवर्तन घडवून आणले आणि राज्यासह महापालिकेत भाजपची सत्ता आली. तेव्हापासून आम्ही धुळे शहराला स्मार्ट, सुंदर आणि स्वच्छ बनविण्याचा संकल्प केला. त्यानुसार धुळे शहरात दीड वर्षापासून आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या संकल्पनेतून विविध विकासकामांतून धुळे शहरात विकासरूपी परिवर्तन घडून येत आहे. शहर विकासाच्या ही परिवर्तनाची नांदी अशीच कायम राहील, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत व शहराचे आ.अनुप अग्रवाल यांच्या संकल्पनेतून देवपूरमधील जीटीपी स्टॉपलगत साकारलेल्या सुलेखन व सरस्वती या सुंदर उद्यानांचे लोकार्पण रविवारी सायंकाळी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. आ.अग्रवाल, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभापती लताबाई सोनार, महिला व बालकल्याण सभापती उज्ज्वला ठाकरे, गटनेत्या किरण कुलेवार, प्रतोद भगवान गवळी, माजी महापौर तथा नगरसेविका जयश्री अहिरराव, प्रतिभा चौधरी, माजी महापौर प्रदीप कर्पे, भाजपचे प्रदेश चिटणीस डॉ. सुशील महाजन, ज्येष्ठ नेते विजय पाच्छापूरकर, महादेव परदेशी, महिला आघाडीच्या अध्यक्षा सुवर्णा पाटील, नगरसेवक सुभाष जगताप, नंदू सोनार, ललित माळी, डॉ. निशा महाजन, प्रभावती शिंदे, कविता कोळी, योगित कुटे, उज्ज्वला भोसले, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस, शहर अभियंता चंद्रकांत उगले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, प्रभागांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**धुळे शहर ठरतेय मॉडेल : रावल**

पालकमंत्री रावल म्हणाले, की विशिष्ट थीमच्या आधारे साकारण्यात आलेली सुलेखन व सरस्वती ही दोन्ही उद्याने शहराच्या वैभवात आणखी भर घालणारी ठरतील. कारण आता भाजपच्या माध्यमातून धुळे शहराला चांगली टीम प्राप्त झाली आहे. शहरात विविध विकासकामे वेगाने सुरू असून, शहर विकसित होत आहे. पूर्वी शिरपूर, दोंडाईचा ही शहरे धुळे जिल्ह्यासाठी मॉडेल बनली होती. आता धुळे शहर मॉडेल ठरू पाहत आहे. मोठ्या शहरांच्या धर्तीवर धुळे शहरातही मोकळ्या भूखंडांवर आधुनिक उद्यानांची निर्मिती होत आहे. जनतेच्या सहभागाशिवाय शहराचा विकास होऊ शकणार नाही. जनतेने आम्हाला पाठबळ दिले आणि महापालिका निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांप्रमाणे आम्ही आता विकासकामे करत आहोत. ही परिवर्तनाची नांदी अशीच कायम राहील, असेही पालकमंत्री रावल यांनी सांगितले.

**शहराचा विकास हेच ध्येय : आ. अनुपभैया**

आमदार अग्रवाल म्हणाले, की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले यांच्या नेतृत्वात आणि सहकार्याने धुळे शहराचा चेहरा-मोहरा बदलण्यात येत आहे. त्यानुसार शहरात विविध विकासकामांचा धडाका सुरू आहे. आगामी पाच महिन्यांत गुरुद्वाराते नगावबारीपर्यंतचे सर्व वीजखांब बाजूला करून अंडरग्राउंड केबल टाकली जाईल. या ७ किलोमीटर रस्त्यावरील डिव्हायडरमध्ये आकर्षक दिवे लावले जातील. मोठ्या पुलावरील पदपथावरील अतिक्रमणे हटवून रस्ता मोकळा केला जाईल. सहा महिन्यांत दोंडाईचातील एका पुलाप्रमाणे सजावटीच्या काही थीम मोठ्या पुलावरही साकारण्यात येत आहेत. प्रभाग सहामधील संतकृपा अपार्टमेंटसमोर भाजी मार्केट, पंचायत समितीजवळील मोकळ्या जागेत दोन आकर्षक उद्याने उभी राहतील. मोगलाईतील रुग्णालयात २८ कोटींतून उभारलेल्या सीटी स्कॅनची फक्त एक हजार रुपयांत रुग्णांना सुविधा उपलब्ध होत आहे. याशिवाय नगावबारी, मोहाडी, भाईजीनगरमध्ये महापालिकेची आयसीयू युनिटसह आधुनिक रुग्णालये सुरू होत आहेत. नगावबारी परिसरातील टेकड्यांवर ऑक्सिजन पार्क विकसित करण्यात येत आहे. या कामांना विरोध होत राहील. विरोधकांमुळे आमच्या विकासकामांची फुकटची प्रसिद्धी होत आहे. यामुळे या विरोधासाठी आम्ही विरोधकांचे आभार मानतो.

आयुक्त कापडणीस यांनी विकासकामांचा आढावा घेतला. पृथ्वीराज पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रभाग एक व दोनच्या नगरसेवक, भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी संयोजन केले.

**धुळे- पुणे रेल्वे साताऱ्यापर्यंत**

आमदार अग्रवाल यांनी सांगितले, की धुळे-मुंबईदरम्यान रात्रीच्या वेळी रेल्वे सुरू करण्यासह धुळे-पुणेदरम्यानही रात्रीची रेल्वेसेवा सुरू करण्याची धुळेकरांची सततची मागणी आहे. या दोन्ही रेल्वेसेवा लवकरात लवकर सुरू करायच्या आहेत. त्यासाठी संबंधित विभागांकडे पाठपुरावा सुरू आहेच. या रेल्वेसेवेअभावी धुळेकर नागिरकांची मोठी गैरसोय होत आहे. ट्रॅव्हल्स चालकांकडून अव्वाच्या सव्वा भाडे आकारले जात आहे. यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने आपणही या दोन्ही रेल्वेगाड्या सुरू करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर आग्रही राहावे, अशी विनंती आमदार अग्रवाल यांनी पालकमंत्री रावल यांच्याकडे केली.




# एचएसआरपी नंबर प्लेटसाठी आता आज शेवटचा दिवस, उद्यापासून दंड

**मुंबई, दि. २९ : राज्यात एक एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एच.एस.आर.पी.) बसविण्यासाठी आता फक्त एकच दिवसाची मुदत उरली आहे. शासनाने दिलेली मुदत उद्या (दि. ३०) संपल्यानंतर, एक जुलैपासून नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर मोटर वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येणार आहे. मुदत संपल्यानंतर पोलीस आणि परिवहन विभागाचे अधिकारी रस्त्यावर संयुक्त किंवा स्वतंत्रपणे दंडात्मक कारवाई सुरू करणार आहेत.**

उच्च सुरक्षा नंबर प्लेट न बसविलेल्या वाहनांची प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अनेक महत्त्वाची कामेही प्रशासनाकडून पूर्णपणे रोखण्यात येणार आहेत. वाहनधारकांना एक जुलैपासून आरटीओमध्ये मोठा फटका बसणार आहे. अशा वाहनांचे हस्तांतरण, पत्ता बदलणे, वाहनावरील कर्जबोजा चढविणे किंवा उतरविणे, वाहनाची पुनर्नोंदणी, वाहनातील इतर बदल तसेच परवाना नूतनीकरण यांसारख्या कोणत्याही आरटीओ सेवा उपलब्ध होणार नाहीत. मात्र, वाहनधारकांना तात्पुरता दिलासा म्हणून वाहनाच्या फिटनेस प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी सध्या ही अट लागू राहणार नाही.

**अपॉइंटमेंट असल्यास दिलासा**

दरम्यान, ज्या वाहनधारकांनी ३० जूनपर्यंत नंबर प्लेट बसविण्यासाठी अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करून अपॉइंटमेंट आहे, अशा वाहनधारकांना एक जुलैपासून सुरू होणाऱ्या दंडात्मक कारवाईतून तात्पुरता दिलासा देण्यात आला आहे. मात्र, ज्यांनी अद्याप नोंदणीच केलेली नाही, त्यांना थेट दंडाचा सामना करावा लागेल. राज्यात हे काम सुलभ व्हावे म्हणून तीन झोन निश्चित करण्यात आले असून, त्यासाठी रोझमेर्टा टेक्नॉलॉजी, रिअल इंडस्ट्रीज आणि एफटीए सोल्यूशन्स या अधिकृत कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शासनाचे अधिकृत दर

सर्वसामान्यांची लूट होऊ नये म्हणून शासनाने या नंबर प्लेट्सचे अधिकृत दर निश्चित केले आहेत. त्यानुसार दुचाकी वाहनांसाठी ४५० रुपये, तीनचाकी वाहनांसाठी ५०० रुपये, तर हलकी मोटार वाहने (कार) आणि मध्यम व अवजड व्यावसायिक वाहनांसाठी ७४५ रुपये दर ठरवण्यात आला आहे (हा दर जीएसटी वगळून असून यात फिटमेंट शुल्काचा समावेश आहे). केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम ५० आणि मोटार वाहन अधिनियमातील कलम १७७ अन्वये ही दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

# विधान परिषदेच्या उपसभापतीसाठी निलम गोऱ्हे, रघुवंशी आघाडीवर

**मुंबई, दि. २९ : विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी उपसभापतीपदासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. जाहीर कार्यक्रमानुसार उद्या (दि.३०) दुपारी बारा पर्यंत इच्छुकांना नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत. त्यानंतर दुपारी एकला अर्जांची छाननी होईल. उपसभापतीपदासाठी शिवसेना शिंदे गटाच्या निलम गोऱ्हे आणि आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या नावाची चर्चा आहे. बदल करण्याचा निर्णय झाला तर रघुवंशी यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे.**

सभापती शिंदे यांनी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, आवश्यक निर्माण झाल्यास माघारीनंतर एक जुलै रोजी मतदान होणार आहे. बिनविरोध निवड झाल्यास त्याच दिवशी उपसभापतीची घोषणा होण्याची शक्यता आहे. विधान परिषदेत भाजपची सदस्य संख्या सर्वाधिक आहे. मात्र तरीही महायुतीतील सत्तावाटपाच्या सूत्रानुसार उपसभापतीपद पुन्हा



एकदा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडेच जाण्याची शक्यता आहे. माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत त्या शिवसेना शिंदे गटाकडून बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा त्यांच्याच गळ्यात उपसभापतीपदाची माळ पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र शिंदे नव्या चेहऱ्याला संधी देण्याची शक्यता असल्याची माहितीही समोर येत आहे. पक्षांतर्गत चर्चेत कृपाल तुमाने, चंद्रकांत रघुवंशी आणि मनीषा कायंदे यांचीही नावे पुढे आली आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपसभापतीपदासाठी शेवटच्या क्षणी नवा चेहरा पुढे करून राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# गुटखा तस्करीत युवकाला अटक

शिरपूर दि.२९ (का.प्र.) - शिरपूर बस स्टँडमधून अमळनेरकडे गुटख्याची तस्करी करणाऱ्या युवकाला शहर पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून प्रतिबंधित गुटखा व पान मसाला जप्त करण्यात आला.

काल दुपारी साडेबाराला बस स्थानकात ही कारवाई झाली.संशयित निखिल रमेश शिंगाणे (वय १९, रा.अमळनेर जि.जळगाव) याला ताब्यात घेण्यात आले. शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांना इंदोर-अमळनेर बस (एमएच २०, बीएल ३३९१) मधून गुटख्याची अवैध वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली होती. उपनिरीक्षक वर्षा पाटील, हवालदार रवींद्र आखडमल व पथकाने संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्याकडून विमल पानमसाला व व्ही तंबाखू असा ३४ हजार ८४८ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून निखिल शिंगाणे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# कृषी विभागाकडून विना परवाना क्रॉप बूस्टर वाटप: गुन्हा दाखल

धुळे, दि. २८- धुळे शहरातील निर्मल कॉलेज येथे खासगी संस्थेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या कृषी मित्र परीक्षेदरम्यान परीक्षार्थींना विना परवाना ६५ टक्के या कृषी निविष्ठेचे वाटप करण्यात आल्याप्रकरणी देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जगताप यांच्या निर्देशानुसार खत निरीक्षक तथा जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अरुण श्रीराम तायडे यांनी संबंधित परीक्षा केंद्राची पाहणी केली. तपासणीदरम्यान परीक्षार्थींना वितरित करण्यात आलेल्या कृषी निविष्ठेच्या विक्रीसाठी आवश्यक परवाना उपलब्ध नसल्याचे आढळून आले. तसेच सदर परीक्षा महाराष्ट्र शासन अथवा कृषी विभागाशी संबंधित नसून ती खासगी संस्थेमार्फत आयोजित करण्यात आल्याची माहिती उपस्थित परीक्षार्थींना देण्यात आली.

परीक्षा संपल्यानंतर १६ परीक्षार्थींनी आपली फसवणूक झाल्याची लेखी तक्रार कृषी विभागाकडे दिली. तपासणीदरम्यान ६५ टक्केची ३१५ पाकिटे (अंदाजे किंमत १ लाख ५१ हजार २००) जप्त करण्यात आली. तसेच परीक्षेचे सीसीटीव्ही फुटेज, ५५ परीक्षार्थ्यांच्या उत्तरपत्रिका, तक्रार अर्ज आणि इतर संबंधित कागदपत्रेही जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणी उत्पादक कंपनीचे जबाबदार अधिकारी, संबंधित खासगी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक तसेच जिल्हा प्रतिनिधी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१६ व ३१८, खत नियंत्रण आदेश, १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील संबंधित तरतुदींनुसार देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृषी विभागाने शेतकरी व युवकांना खासगी संस्था आयोजित परीक्षा, प्रशिक्षण किंवा कृषी निविष्ठांचे वितरण यामध्ये सहभागी होण्यापूर्वी संबंधित परवानगी, अधिकृतता आणि शासनाशी असलेला संबंध याची खातरजमा करण्याचे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

# उघड्यावर मासे विक्री बंद करण्याची मागणी

नंदुरबार,दि.२९ (प्रतिनिधी) - भारतीय जनता पक्षाचे उत्तर महाराष्ट्र विभाग संयोजक विजय चौधरी यांनी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांना निवेदन देऊन नंदुरबार शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आवारात असलेले बेकायदेशीर कबरीचे अतिक्रमण हटविण्यात यावे तसेच शहरातील उघड्यावर सुरू असलेली मासविक्री तातडीने बंद करण्यात यावी, अशी मागणी केली.



यावेळी जिल्हा चिटणीस राजेंद्र सोनार, भिमसिंग राजपूत, जिल्हा कोषाध्यक्ष प्रेमराज पाटील, कायदा आघाडी अध्यक्ष ॲड. महेश माळी, युवराज राजपूत, जयेश चौधरी, प्रवीण मराठे, विजय नाईक, प्रशांत चौधरी, अध्यात्मिक आघाडी अध्यक्ष दिनेश पाठक, विशाल श्रीखंडे, कैलास भावसार, हेमंत कदम, घनश्याम चौधरी, प्रमोद चौधरी, दिनेश वळवी आदी उपस्थित होते.

**URGENT REQUIREMENT**
We are hiring
**ACCOUNTANT & GODOWN SUPERVISOR**
JOIN OUR TEAM

ACCOUNTANT – REQUIREMENTS:
- Minimum 5 years of accounting experience
- Well-versed in Tally Prime / Tally ERP
- Strong knowledge of bookkeeping, accounts payable/receivable, GST, and financial record management
- Good communication and organizational skills

GODOWN SUPERVISOR – REQUIREMENTS:
- Minimum 5 years of experience in warehouse / godown management
- Knowledge of stock handling, inward/outward management, inventory control and documentation
- Good communication and leadership skills
- Ability to manage team and ensure smooth operations

CONTACT: 02562-295822 | 9422601608
ADDRESS: Rishabh Agencies
189/1, near 12ft. Hanuman statue, Malegaon road, Dhule - 424311



जिवेत शरद: शतम्

समस्त धुळेकरांना आपलेसे वाटणारे, शहराचे भूषण सन्माननीय
**श्री. आप्पासाहेब किशोर पाटील**
८२ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
**आप्पासाहेबांच्या मैत्रीची ५६ वर्षांची वाटचाल..**
यशस्वी उद्योजक
आदर्श व्यक्तीमत्व, अजात शत्रू, जेही आप्पाच्या सहवासात आले त्यांचं सोनेचं झालं
परीसरुपी स्पर्शाच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाचे जीवन सुवर्णमय झाले...
प्रसिध्दी विन्मुख, निगर्वी, अविश्रांत काम अत्यंत सचोटीने यशस्वी व्यापार,
उद्योग करणाऱ्या उद्यमशील व्यक्तीमत्व.. कोणालाही मैत्रीचा अभिमान वाटावा,
निगर्वी, शांत, संपर्कात आलेल्या धुळेकरास आपलेसे वाटणारे कोणतेही काम आप्पांच्या
स्पर्शाने पुर्णत्वास येतं.. त्यांच्या हाताला यश आहे (कोणी दैवी शक्ती म्हणतात)
आप्पा कधीच लोभी, लालची वाटले नाही.. बांधकाम व्यवसाय असो वा इतर..
टोकाचा प्रामाणिकपणा जपणारे.. त्यात यश व आपली श्रध्दा मानणारे..
लोभ कधी केला नाही, आलेल्या गरजूला.. शक्य ती मदत व अनुभवातुन सल्ला दिला आहे..
**वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!**
शुभेच्छुक
**विजयसिंह जमादार**
अभिजित जमादार | विरेंद्र जमादार | सचिन जमादार

**पाहिजे**
दै. आपला महाराष्ट्रच्या नवीन आवृत्तीसाठी संपादकीय विभागाचे ज्ञान व दैनिकाचे स्वत: पाने लावू शकणारा होतकरु उपसंपादक लावणे आहे.
-: संपर्क :-
9422286496

**किडनी रोग तज्ञ**
**डॉ.ललित देसले**
डी एम (नेफ्रॉलॉजिस्ट) किडनी रोग तज्ञ
- ओपीडी वेळ -
सकाळी - १० ते २
संध्याकाळी- ४ ते ६
ठिकाण -
ओम हॉस्पिटल, अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे.
- संपर्क -
02562-241313, 283318
9881116734
9890038308

**पाहिजेत**
श्री.अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळ, धुळे संचलित अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारी, शिवाजी रोड, धुळे. येथील कामासाठी कर्मचारी भरती करावयाची आहेत. तरी ईच्छुकानी खालील पदानुसार अर्ज करावे.
१) सुपारवायजर- ०४ पदे
२) स्विपर (सफाई कर्मचारी) - ०२ पदे
३) सह व्यवस्थापक - ०१ पद
४) वॉचमेन- ०२ पदे (परिवारसह राहण्यासाठी)
कृपया वरील पदांसाठी ईच्छुक उमेदवारानी वरील संस्थेत अर्ज करावे. संस्थेच्या निवास स्थानात राहणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.
व्यवस्थापक
मो.नं.9834332117, (02562) 359374

**SUDARSHAN GROUP**
We Are Hiring !
**OPEN POSITIONS**
Account Officer - Location (Dhule)
Account Head - Location (Chiplun)
HR cum Safety Officer - Location (Chiplun)
Required Experience - 2 to 8 Years
**APPLY NOW**
Send your CV to :
Kapilsaraf@sudarshangroup.net
Sudarshan Minerals & Ind
E.127 MIDC Awdhan Dhule
Mo.9823282182

**पाहिजेत**
रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिल्या जातील.
अपोलो गारमेन्ट
गरुड मैदान कॉम्प्लेक्स, साक्रीरोड, धुळे
7498748799

**भाड्याने देणे आहे**
दत्त मंदिर परिसर SNDT कॉलेज जवळ देवपूर, धुळे १००० ते १२०० स्के. हॉल व दुकान भाड्याने देणे आहे.
7710203080

**भाड्याने देणे आहे**
रेडी हॉटेल/कॅफे सेटअपसह (१५X३०) शॉप देवरे हॉस्पिटल जवळ, दत्त मंदिर, देवपूर, धुळे
- संपर्क -
8999028990
9175478946

**जागा भाड्याने देणे**
शहरातील मध्यवर्ती ठिकाणी आग्रारोड श्रीराम मंदिरा मागे ग.नं.३ येथील १०६० दुकान, ऑफिस, गोडाऊन कमर्शियल सेमी बेसमेंट जागा भाड्याने देणे आहे
-: संपर्क :-
9822752149

**प्रवेश सुरु २०२६-२७**
क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव यांच्या संलग्नतेने सत्कार्योत्तेजक सभेचे भारतीय विद्या संशोधन केंद्र, रामवाडी धुळे येथे खालील अभ्यासक्रमाचे प्रवेश देणे सुरु आहे.
१. **पी.जी.डिप्लोमा इन गायडन्स अॅण्ड कौन्सीलींग** - १ वर्ष
२. **ज्येष्ठांचे मानसशास्त्र व समुपदेशन** - ६ महिने
३. **संस्कृत भाषा परिचय आणि संभाषण कौशल्य** - ६ महिने
४. Certificate Course in Communicative English - ३ महिने
५. **प्रमाणपत्र अभ्यासक्रम- मोडीलिपी** - ३ महिने
अखिल भारतीय कीर्तन संस्था दादर यांच्या
१. **कीर्तनालंकार पदवी अभ्यासक्रम** - साडेतीन वर्ष
जागा मर्यादित आहे. आपला प्रवेश आजच निश्चित करा.
संपर्क :- डॉ.एन.एम.जोशी
9421500882, 9146768700, 9623143714

**WANTED**
Clever & Experience Holder Pharmacist
Pay 13000/-
9823833108

New Models
ऑफर .... ऑफर .... ऑफर ....
Authorised Dealer
LG Panasonic Godrej



2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर*
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.*
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
**श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.**
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०